प्रिय विद्यार्थी मित्रांनो,
तुम्ही सगळे मजेत असालच.
सध्या महाविद्यालय व तेथील सर्व कामे बंद आहेत. सर्व शिक्षक तुम्हाला पुन्हा भेटण्याची वाट पाहत आहेत. कामे सुरू झाली की आम्ही तुम्हाला कळवूच. तो पर्यंत तुम्ही काही गोष्टी करा
1) हातातले घड्याळ काढुन ठेवा कारण त्याला स्वच्छ करता येणे नाही
2) वारंवार हात साबणाने स्वच्छ धुवा. 20 सेकंद एखादे गाणे म्हणत
3) इतर सगळ्यांपासून सुरक्षित अंतर ठेवा, घरच्यांपासून सुद्धा
4) सगळ्यात महत्वाचे, अत्यंत आवश्यक असल्याशिवाय बाहेर पडू नका. ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, नागरिक म्हणून राष्ट्रीय कर्तव्य आहे.
5) एकमेकांना फोन करा, छान छान पुस्तके वाचा, सिनेमा बघा, घरातील कामे करा, पुढच्या अभ्यासाची तय्यारी करा। दिवसभर शक्य होईल तितके मग्न राहा.
लवकरच सर्व सुरळीत होईल.
आम्ही सर्व शिक्षक तुम्हाला भेटण्यास आतुर आहोत.
आपण सर्व मिळुन या स्थितीवर मात करू।

आपले अभिनव महाविद्यालयातील प्राचार्य व सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी